# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 14 August 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १४ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- आज विभाजन विभिषिका स्मृतीदिन–फाळणीचं दुःख भोगलेल्या नागरिकांचं पंतप्रधानांकडून स्मरण; ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपतींचं आज राष्ट्राला संबोधन
- देशभरातल्या एक हजार ३७ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकं जाहीर–महाराष्ट्रातल्या ५९ जणांचा समावेश
- डेंग्यू लसीच्या तिसऱ्या टप्प्याच्या क्लिनिकल ट्रायलला सुरुवात
- जुलै तसंच ऑगस्ट महिन्याचं राशन वितरण ऑफलाईन पद्धतीनं करण्यास मान्यता

आणि

- हॉकी इंडियाकडून भारतीय हॉकी संघातल्या १६ क्रमांकाच्या जर्सीच्या निवृत्तीची घोषणा

****

विभाजन विभिषिका स्मृतीदिन अर्थात देशाच्या फाळणीचं स्मरण आज केलं जात आहे. फाळणीमुळे दुःख भोगलेल्या असंख्य लोकांचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्मरण केलं. देशाची एकता आणि बंधुत्वाची भावना सदैव जपण्याचं त्यांनी आवाहन केलं.

****

७८वा स्वातंत्र्य दिन उद्या देशभरात साजरा होणार आहे. या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज सायंकाळी देशवासियांना संबोधित करणार आहेत. संध्याकाळी सात वाजता राष्ट्रपतींचं हे भाषण आकाशवाणीवरून प्रसारित

होईल. यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्रावरून दररोज सायंकाळी सात वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज सायंकाळी सहा वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित केलं जाणार आहे. राष्ट्रपतींच्या भाषणाचा प्रादेशिक भाषांमधला अनुवाद रात्री साडे नऊ वाजता प्रसारित केला जाणार आहे.

****

उद्या स्वातंत्र्यदिनी दिल्लीत मुख्य ध्वजारोहण समारंभात लाल किल्ल्यावर पंतप्रधान राष्ट्रध्वज फडकावतील आणि देशाला संबोधित करतील. यंदाच्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याची संकल्पना, ‘२०४७ ला विकसित भारत’, अशी आहे. स्वातंत्र्य दिन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी केंद्र सरकारनं देशभरातून समाजातल्या विविध क्षेत्रातल्या विशेष पाहुण्यांना आमंत्रित केलं आहे. यामध्ये महाराष्ट्रातल्या १२३ हून अधिक व्यक्तीं असून, त्यांच्यामध्ये छत्रपती संभाजीनगरच्या सारिका धन्यकुमार जैन, जालना जिल्ह्याच्या बदनापूर तालुक्यातल्या ढासला ग्रामपंचायतीचे सरपंच राम पाटील आणि त्यांच्या पत्नी वर्षाराणी पाटील, परतूर तालुक्यातले रमेश भापकर आणि त्यांच्या पत्नी पूजा भापकर यांचा समावेश आहे.

****

राज्याचा ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबईत मंत्रालयात सकाळी नऊ वाजून पाच मिनिटांनी ध्वजारोहण करून साजरा करण्यात येईल. राज्यभरात एकाच वेळी सकाळी नऊ वाजून पाच मिनिटांनी ध्वजारोहणाचा शासकीय समारंभ आयोजित करण्यात येणार असून, सकाळी आठ वाजून पस्तीस मिनिटं ते नऊ वाजून पस्तीस मिनिटं, या वेळेत इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये, असं राजशिष्टाचार विभागानं कळवलं आहे.

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी दिलं जाणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या सकाळी सहा वाजून ४० मिनिटांनी प्रसारित होणार आहे.

****

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पोलीस, अग्निशमन, होमगार्ड, नागरी सुरक्षा आणि सुधारणा सेवेतल्या एकंदर १ हजार ३७ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकांची घोषणा करण्यात आली आहे. यात महाराष्ट्रातल्या विविध सेवांमध्ये कार्यरत असलेल्या ५९ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक अनुज

तारे यांना शौर्यपदक जाहीर झालं आहे. तर अतिरिक्त महासंचालक चिरंजीव प्रसाद, संचालक राजेंद्र डहाळे आणि सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांना परमसेवा पदक घोषित झालं आहे. छत्रपती संभाजीनगर इथे कार्यरत सहाय्यक पोलीस उप निरीक्षक द्वारकादास महादेवराव भांगे यांना प्रशंसनीय सेवेसाठीचं पदक जाहीर झालं आहे.

****

भारतीय आयुर्विज्ञान संशोधन परिषद-आयसीएमआर आणि पॅनएशिया बायोटेक यांनी भारतात डेंग्यू लसीच्या तिसऱ्या टप्प्याच्या क्लिनिकल ट्रायलची सुरुवात केली आहे. या चाचण्यांमधून, पॅन-एशिया बायोटेकनं विकसित केलेल्या, डेंगीऑल या लसीचा प्रभावकारकपणा तपासला जाईल. या लसीमुळे लोकांचं आरोग्य राखण्यासह देशानं आरोग्यसेवा क्षेत्रात स्वयंपूर्णतेकडे पाऊल टाकल्याची प्रतिक्रिया आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी.नड्डा यांनी दिली आहे.

****

अन्न आणि नागरी पुरवठा विभागानं जुलै आणि ऑगस्ट महिन्याचं धान्य वितरण ऑफलाईन पद्धतीनं करायला मान्यता दिली आहे. गेल्या काही दिवसात ई-पॉस यंत्राच्या तांत्रिक अडचणीमुळे राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या लाभार्थींना धान्य वितरण होऊ शकत नव्हतं. याकडे सरकारचं लक्ष वेधून घेण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतल्या दुकानदारांनी निदर्शनही केली होती. तांत्रिक अडचणीमुळे हे लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नयेत, यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे.

****

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे चित्रपट पुरस्कार आज जाहीर करण्यात आले. चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना आणि स्वर्गीय राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहीर झाला आहे. चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार लेखक, दिग्दर्शक, अभिनेता दिग्पाल लांजेकर यांना, तर स्वर्गीय राज कपूर विशेष योगदान पुरस्कार ज्येष्ठ लेखक, दिग्दर्शक, संकलक एन.चंद्रा यांना जाहीर झाला आहे.

****

हॉकी इंडियाने भारतीय हॉकी संघातली १६ क्रमांकाची जर्सी निवृत्त केली आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सलग दुसरं कांस्यपदक मिळवणाऱ्या भारतीय संघाचा गोलकीपर पी आर श्रीजेश यांची ही जर्सी यानंतर मैदानावर दिसणार नाही. श्रीजेश यांच्या गौरव सोहळ्यात हॉकी इंडियाचे महासचिव भोलानाथ सिंह यांनी ही घोषणा केली. श्रीजेश यांना भारतीय कनिष्ठ हॉकी संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीजेश हे कनिष्ठ संघात नवीन श्रीजेश घडवतील, तोच कनिष्ठ संघात ही १६ क्रमांकाची जर्सी परिधान करेल, असं सिंह यांनी सांगितलं.

****

सायबर गुन्हे किंवा सामाजिक माध्यमांवरच्या फसवणुकीबाबत घाबरून न जाता सर्वप्रथम आपल्या आईवडीलांशी बोला आणि त्यानंतर पोलिसांशी संपर्क साधा, असं आवाहन राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी युवक युवतींना केलं आहे. नवी मुंबई पोलिसांच्या वतीनं सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्सअॅप चॅनेल हेल्प लाईनचं अनावरण शुक्ला यांच्या हस्ते आज करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. या हेल्पलाईनच्या माध्यमातून विविध गुन्हे तसंच महिला सुरक्षेसंदर्भात जनजागृती करण्यात येणार आहे. यावर नागरिकांचा येणारा प्रतिसाद पाहून अशी मदतवाहिनी आणि व्हॉट्सअॅप चॅनेल राज्यभरात लागू करणार असल्याचं शुक्ला यांनी यावेळी सांगितलं.

****

हर घर तिरंगा मोहिमेनिमित्त देशभरात उत्साहाचं वातावरण असून, तिरंगा यात्रा, सेल्फी आणि तिरंगा रॅलींचा जल्लोष सुरू आहे.

बीड जिल्ह्यातल्या विविध शाळांमध्ये तिरंगा मिरवणूक तसंच तिरंगा मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. चिंचपूर जिल्हा परिषद शाळेच्या वतीनं पंचाहत्तर मीटर लांबीच्या तिरंगा ध्वजाची मिरवणूक काढण्यात आली.

परभणीतही शहर महानगरपालिका, महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागांनी हर घर तिरंगा अभियानांतर्गत परभणी शहरात तिरंगा रॅलीचं आयोजन केलं. यावेळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी तिरंगा अभियानाची शपथ दिली.

****

स्वातंत्र्यासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवून आपल्या प्राणांचं बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांचं स्मरण करणं हे आपलं आद्यकर्तव्य असून त्यासाठीच स्वातंत्र्याचं प्रतीक असलेल्या तिरंग्याचं ‘हर घर तिरंगा’ हे अभियान राबवण्यात येत आहे, असं

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. ते आज जिल्हाधिकारी कार्यालयात सगळ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तिरंगा ध्वज वितरीत करण्यात आला, त्यावेळी बोलत होते. प्रत्येकानं देशाला सर्वतोपरी मानून देशाप्रति आपलं कर्तव्य बजावण्यास प्राधान्य द्यायला हवं असं मतही स्वामी यांनी यावेळी व्यक्त केलं.

****

२०२३ खरीप अनुदानासाठी ई–पीक पाहणी पोर्टल द्वारे पिकांची नोंदणी करण्याची अट रद्द करून शेतकऱ्यांना सरसकट प्रतिहेक्टर पाच हजार रुपयांची मदत करण्यात यावी अशी मागणी आमदार नमिता मुंदडा यांनी केली आहे. या मागणीचं निवेदन त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे सादर केलं आहे.

****